लोकमत

# कुलगुरू शिर्के 'फेलो ऑफ दि सोसायटी'

## संख्याशास्त्रातील योगदानाची दखल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे



कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स या संस्थेने 'फेलो ऑफ दि सोसायटी' पुरस्काराने सन्मानित केले आहे. संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या विकासात दिलेल्या लक्षणीय योगदानाबद्दल हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला आहे. मानपत्र, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती येथे मुख्यालय असणाऱ्या इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स आणि कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीतर्फे कोचीन येथे दि. ४ ते ६ जानेवारी दरम्यान संस्थेची ४२ वी वार्षिक परिषद पार झाली. त्यामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के यांना पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन होते. मात्र, या काळात पूर्वनियोजित महत्त्वपूर्ण बैठकीस त्यांना उपस्थित राहावयाचे असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत पुरस्काराची घोषणा करण्यात आली. मानपत्रामध्ये संख्याशास्त्र व वारंवारिता या क्षेत्रांच्या विकासामध्ये गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ दिलेल्या योगदानाचा उल्लेख आहे.

पुढारी

# कुलगुरू शिर्के यांचा 'फेलो ऑफ दि सोसायटी' पुरस्काराने सन्मान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांना इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स या संख्याशास्त्रातील राष्ट्रीय आघाडीच्या संस्थेकडून 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा सन्मानाचा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात दिलेल्या लक्षणीय योगदानाबद्दल हा पुरस्कार बहाल करण्यात येत असल्याचे संस्थेच्या प्रमाणपत्रात म्हटले आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती मुख्यालय असणाऱ्या इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स (आयएसपीएस) आणि कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोचीन येथे संस्थेची ४२ वी वार्षिक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये पुरस्काराची घोषणा केली होती. त्यानुसार मानपत्र व प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

या पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली असून गेल्या ३५ वर्षांमध्ये शिक्षक, संशोधक म्हणून जे योगदान देत राहिलो, त्याचे फलस्वरूप म्हणजे हा पुरस्कार असल्याची भावना डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

पुण्यनगरी

# कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना राष्ट्रीय पुरस्कार


## इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्सकडून योगदानाचा गौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आणि ज्येष्ठ संख्याशास्त्रज्ञ डॉ. दिगंबर शिर्के यांना इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स या संख्याशास्त्रातील राष्ट्रीय आघाडीच्या संस्थेकडून 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा सन्मानाचा पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले आहे. संख्याशास्त्र आणि वारंवारिता क्षेत्राच्या प्रगती आणि विकासात दिलेल्या लक्षणीय योगदानाबद्दल हा पुरस्कार बहाल करण्यात येत असल्याचे संस्थेच्या प्रमाणपत्रात म्हटले आहे.

आंध्र प्रदेशातील तिरुपती मुख्यालय असणाऱ्या इंडियन सोसायटी फॉर प्रॉबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स आणि कोचीन येथील कोचीन युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने कोचीन येथे दि. ४ ते ६ जानेवारी २०२३ या कालावधीत संस्थेची ४२ वी वार्षिक परिषद पार पडली. या परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना 'फेलो ऑफ दि सोसायटी' हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्याचे नियोजन होते. तथापि, या काळात पूर्वनियोजित महत्त्वपूर्ण बैठकीस उपस्थित राहायचे असल्याने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या अनुपस्थितीत पुरस्काराची घोषणा करण्यात आली. नुकतेच डॉ. शिर्के यांना या पुरस्काराचे मानपत्र व प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. सोसायटीने प्रदान केलेल्या मानपत्रामध्ये कुलगुरू तथा संख्याशास्त्रज्ञ डॉ. शिर्के यांनी संख्याशास्त्र व वारंवारिता या क्षेत्रांच्या विकासामध्ये गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

सकाळ



कोल्हापूर : ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त लेखक वि. स. खांडेकर यांना जयंतीनिमित्त बुधवारी (ता.११) विद्यापीठात अभिवादन करण्यात आले.

# वि.स.खांडेकर यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर, ता. ११ : मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'वि. स. खांडेकर यांच्या स्मृती विद्यापीठाने या संग्रहालयाच्या स्वरूपात जतन केल्या आहेत. या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्षात नागरिकांनी या संग्रहालयामध्ये येऊन प्रेरणा घ्यायला हवी.' प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, यांच्यासह संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इंग्रजी विभागाचे दीपक भादले, हिंदी विभागाचे हेमंत जाधव, तसेच कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** मराठी साहित्यास भारतीय ज्ञानपीठाचे पहिले पारितोषिक मिळवून देणारे साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रामचंद्र पवार, दीपक भादले, हेमंत जाधव उपस्थित होते.

12 JAN 2023
जनसंपर्क कक्ष
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पहिले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक वि.स. खांडेकर यांना १२५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या वि.स. 'खांडेकर स्मृती संग्रहालात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

जनसपर्क कक्ष
12 JAN 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैवरेणू नॅनो धातूकण संशोधनास राष्ट्रीय पेटंट

प्रतिनिधी
कोल्हापूर

फौंड्रीच्या सांडपाण्यामध्ये आढळणाऱ्या जिवाणूंच्या जैवरेणूंपासून मेटल नॅनो पार्टीकल (नॅनो–धातूकण) बनविण्याची सुलभ व अल्पखर्चिक पद्धती विकसित करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनास नुकतेच भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले आहे. हे संशोधन डॉ. किरण पवार आणि संशोधक विद्यार्थिनी मेघा देसाई यांनी केले आहे. नॅनो–बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील हे एक महत्त्वपूर्ण संशोधन असून वैद्यकशास्त्र, पर्यावरण, बायोसेन्सिंग आदी क्षेत्रांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे.



डॉ. किरण पवार



मेघा देसाई

**मानवजातीच्या कल्याणासाठीचे महत्त्वाचे संशोधन**

नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधनाला पेटंट प्राप्त झाले. हे संशोधन मानव कल्याणासाठी उपयुक्त आहे. वैद्यकशास्त्रासह जैवतंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन, बायोसेन्सिंग आदी विविध क्षेत्रांमध्ये या संशोधनाचे उपयोजन शक्य आहे.

–कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के

डॉ. पवार म्हणाले, अल्पखर्चात व जलद पद्धतीने जैवसुसंगत मेटल नॅनोपार्टिकल्स तयार करता येऊ शकतात. हे मिश्रण पावडर स्वरूपामध्ये उपलब्ध असून यामार्फत बनवलेले जैवसुसंगत मेटल नॅनोपार्टिकल्स हे जैवतंत्रज्ञान, जैववैद्यकीय, पर्यावरण शास्त्र, बायोसेन्सिंग क्षेत्रांत उपयोग होतो. भारतीय पेटंटसोबतच आंतरराष्ट्रीय पीसीटी–पेटंट मान्यतेसाठीची प्रक्रिया सुरू आहे. या संशोधनासाठी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 JAN 2023 पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या कर्करोग संशोधनावर राष्ट्रीय पेटंटची मोहोर

## जैव रेणूंपासून नॅनो-धातुकण बनवण्याची नवी पद्धती विकसित

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

फौंड्रीच्या सांडपाण्यामध्ये आढळणाऱ्या जिवाणूंच्या जैव रेणूंपासून नॅनो मेटल पार्टिकल्स (नॅनो-धातुकण) बनवण्याची सुलभ व अल्प खर्चिक पद्धती विकसित करण्यात शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या संशोधकांना यश आले आहे. या संशोधनास नुकतेच भारत सरकारकडून पेटंट प्राप्त झाले आहे. कर्करोगासाठी वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक उपचार पद्धतीला पर्याय म्हणून हे संशोधन उपयुक्त ठरणार असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स व बायोटेक्नॉलॉजी येथील सहायक प्राध्यापक डॉ. किरण दगडू पवार आणि विद्यार्थिनी संशोधक मेघा प्रकाश देसाई यांनी हे संशोधन केले आहे. नॅनो बायोटेक्नॉलॉजी क्षेत्रातील हे एक महत्त्वपूर्ण संशोधन असून, वैद्यकशास्त्र, पर्यावरण, बायोसेन्सिंग आदी क्षेत्रांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. डॉ. पवार व देसाई यांनी नॅनो-धातुकण तयार करण्यासाठी उपयोगी असणाऱ्या जिवाणूंपासून बायोमॉलेक्यूल (जैव रेणू) मिश्रण तयार करण्याची नवीन पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीच्या उपयुक्ततेची माहिती देताना डॉ. पवार म्हणाले की, या पद्धतीचा अवलंब करून अल्प खर्चात सोप्या, सुलभ व जलद पद्धतीने जैवसुसंगत (बायोकम्पॅटिबल) मेटल नॅनो पार्टिकल्स तयार करता येऊ शकतात. हे मिश्रण पावडर स्वरूपामध्ये उपलब्ध असून, यामार्फत बनवलेले जैवसुसंगत (बायोकम्पॅटिबल) मेटल नॅनो पार्टिकल्स हे जैव तंत्रज्ञान, जैव वैद्यकीय, पर्यावरणशास्त्र, बायोसेन्सिंग इत्यादी क्षेत्रांमध्ये उपयोगी होऊ शकतात.

### मानवजातीच्या कल्याणासाठीचे महत्त्वाचे संशोधन

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात झालेले सदरचे पेटंटप्राप्त संशोधन हे मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीने झालेले एक महत्त्वाचे संशोधन आहे. वैद्यकशास्त्रासह जैवतंत्रज्ञान, पर्यावरण संवर्धन, बायोसेन्सिंग आदी विविध क्षेत्रांमध्ये या संशोधनाचे उपयोजन शक्य आहे.

- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

लोकमत

# विद्यापीठात आज रक्तदान शिबिर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि कोल्हापूर विवेकानंद केंद्र यांच्यामार्फत विवेकानंद जयंतीनिमित्त आज गुरुवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात सकाळी १०:३० ते २ या वेळेत शिबिर होणार आहे.